नियंत्रक कार्यालय
**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.**

दुरध्वनी क्रमांक : (०२४५२) २२५४२४
Email ID : comptrollermkvpbn@gmail.com

जा.क्र.सीएफवी/आयसीएआर/ 1632 /२०२२

दिनांक: ०१/०८/२०२२

महत्वाचे

# परिपत्रक

**विषय : भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या (ICAR) योजनांमध्ये प्राप्त होणाऱ्या ऑनलाईन/ऑफलाईन अनुदानाचा तपशील नियंत्रक कार्यालयास तात्काळ उपलब्ध करुन देणे बाबत.....**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी अंतर्गत (ICAR) (भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या योजना) यांना कळविण्यात येते की, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात केंद्र सरकार/ आयसीअेआर यांच्याकडून आपल्या अंतर्गत कार्यरत असलेल्या योजनेसाठी प्राप्त होणारे अनुदानाचा तपशील (आनलाईन/ऑफलाईन) आपणांस ई-मेलद्वारे अथवा पोस्टद्वारे प्राप्त झाल्यास, त्यासंबंधीचा तपशील तात्काळ नियंत्रक कार्यालयात आयसीअेआर कार्यासनाकडे संबंधीत ई-मेल/पोस्टद्वारे प्राप्त झालेल्या पत्राच्या छायाप्रतीसह उपलब्ध करुन देण्याबाबत मा. कुलगुरु महोदय यांनी निर्देशीत केले आहे.

सदर प्राप्त होणाऱ्या निधी बाबत / अनुदानाबाबत नियंत्रक कार्यालयास तात्काळ माहिती उपलब्ध करुन न दिल्यास, निधीचा तपशिल उपलब्ध नसल्याने आपल्या कार्यालयाचे देयके उपलब्ध निधीचा तपशील दर्शविल्याशिवाय पारीत करण्यात येणार नाहीत याची कृपया गांर्भियाने दखल घ्यावी व प्राप्त होणारे निधीचा/ अनुदानाचा तपशील तात्काळ खासदुतामार्फत नियंत्रक कार्यालयातील आयसीअेआर कार्यासनाकडे उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

तसेच आपल्या योजनेतील प्राप्त होणारे निधी/अनुदान व खर्चाचा प्रत्येक महिनानिहाय ताळ-मेळ घेण्यासाठी संकलन कार्यासनाकडे संबंधीत कर्मचाऱ्यास पाचारण करावे, म्हणजे उत्पन्नाचा व खर्चाचा ताळ-मेळ घेता येईल.

नियंत्रक
वनामकृवि, परभणी

**प्रतिलपी :**

१. मा. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) / मा. संचालक संशोधन / मा. संचालक विस्तार शिक्षण / मा. सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव सादर.
२. मा. कुलसचिव, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव सादर.

**प्रति,**

१. सर्व अहरण व संवितरण अधिकारी/कार्यालय प्रमुख, वनामकृवि, परभणी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
२. पुर्व लेखा परिक्षण व अधिदान अधिकारी, वनामकृवि, परभणी यांना माहीतीस्तव.

**प्रत,**

१. मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव सादर.
२. प्रभारी अधिकारी, मुख्य संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

D:\Comptroller\Circular.docx

Scanned with CamScanner